Vol 4 Issue 11 May 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.



## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063 Impact Factor :3.4052(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | May - 2015 Available online at www.aygrt.isrj.org

# सम्राट अकबरकालीन (१५५६-१६०५) सांगीतिक स्थिती : एक अवलोकन

अर्चना माधव अंभोरे
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला .



**सारांश :**
प्राचीन काळापासून ते आजतागायत या भारतभूमीत अनेक कलाकार झालेत. अनेक संगीत शास्त्रकारांनी येथे जन्म घेतला संगीत कलेच्या इतिहासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अनेक उतार-चढाव आले तरी आपली संस्कृती, भारतीय संगीत कला आजही मूळ रुपात, अक्षुण्ण स्वरुपात विद्यमान आहे. मोगलांच्या आक्रमणाचा प्रभाव संगीत कलेवर पडणे स्वाभाविक आहे. अकबर कालीन सांगीतिक स्थिती चा परामर्श या शोधनिबंधात घेतला गेला आहे.

**बीज शब्द** -संगीत, सांगीतिक स्थिती, अकबर, तानसेन, धृवपद, अष्टछाप कवि इ.

## प्रस्तावना :

संगीततज्ञ, संगीत चिंतक, साहित्य समीक्षक, सामाजिक, धार्मिक नेत्यांनी आचार्यांनी अकबरच्या काळाला संगीताचे स्वर्णयुग मानले आहे. अकबर (१५५६-१६०५ ई.) १२ व्या वर्षी गादीवर बसला. अनेक गुणी लोकांच्या सहवासात जन्मजात प्रतिभा उजळून निघाली. त्याने आपल्या दरबारात भारतातीलच नव्हे तर इतर देशातील संगीतकारांना देखील स्थान दिले. ज्या दाक्षिणात्य संगीतकारांनी मेल सिद्धांत स्विकारला होता त्याचे मूळ ईरानी मुकाम पद्धतीत होते ते ग्रंथकार देखील अकबराच्या दरबारात येत असत. पुंडरिक विठ्ठलाचे नाव अग्रणी आहे. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा अकबर पुरस्कर्ता होता. जातिभेदास दूर ठेवणारा हा समाज सुधारक सम्राट कलेचा ज्ञाता देखील होता. गुणग्राहक होता.

## अकबराच्या काळातील सांगितिक प्रगती :

१)अकबराचा काळ हा संगीताचे सुवर्णयुग मानला गेला आहे.
२)महत्वपूर्ण संगीत ग्रंथांचा लेखन काळ.
३)महान संगीतज्ञ तानसेनाचा काळ.
४)पुंडरिक विठ्ठलाने चार महत्त्वपूर्ण ग्रंथ -
१) सद्राग चंद्रोदय २) राग मंजरी ३) रागमाला ४) नृत्य वा नर्तन निर्णय

५)धृपद गायकीच्या प्रगतीचा काळ.
६)अष्टछाप कवींचा काळ
७)सूर - मीरा - तुलसीदासांचा काळ.

इतिहास कार 'डामो'१ याच्या मतानुसार 'मुगल काळाच्या प्रारंभी किंवा त्याही पूर्वी पासूनच भारतीय संगीत विकसित होत होते. या काळात भारतीय संगीत दोन्ही रुपांसोबतच विकसित होतांना दिसून येते.

चैतन्य महाप्रभू आपल्या संकीर्तनातून सामान्य जनतेस आकर्षित करीत होते, तर दुसरीकडे 'ख्याल' आणि 'कव्वाली' सारख्या गीत शैलींमुळे संगीत विकसित होऊ लागले होते.

मोलोगिनच्या२ शब्दात सांगायचे झाल्यास मुगल काळाच्या प्रारंभी दक्षिणेतील संगीत आपल्या प्राचीन गौरवास विकसित करीत होते तर उतर भारताच्या विशाल प्रांगणात विदेशी संगीताने मिश्रित भारतीय संगीताची एक विचित्र आभा फाकली होती. मोगल काळाच्या प्रथम टप्प्यामध्ये संपूर्ण भारतात सांगीतिक हालचाली दिसायला लागल्या. कधी ख्यालाच्या स्वरुपात किंवा कधी टप्प्याच्या स्वरुपात. कीर्तन, भजनादि गीतांच्या रुपात देखील दिसू लागल्या होत्या.

### *अकबरकालीन सांगीतिक उल्लेखनीय कार्य -*

१)अनेक ग्रंथांचे फारसीतून संस्कृत आणि संस्कृतातून फारसी भाषेत अनुवाद केल्या गेलेत.
उदा. भारतीय महाकाव्यापैकी सर्वप्रथम महाभारत आणि रामायणाचा अनुवाद फारसी भाषेत केला गेला.३
२)अकबराचा दरबार फारसीच्या अनेक विद्वानांनी कवि, लेखकांनी सुशोभित होता.४
३)अकबराच्या नवरत्नांपैकी एक रत्न संगीत सम्राट तानसेन देखील यांच काळातले. तानसेनांचे ग्रंथ १) राग-माला २) रागसागर ३) तसेच गणेश स्तोत्र याच काळात लिहिल्या गेले.
४)सूर, तुलसी, कबीर, मीरा, नरहरी, गंग, रहीम इ. प्रतिभाशाली कविंनी हा काळ समृद्ध बनविण्यास हातभार लावला. करणा भरण, श्रुति-भूषण, भूप-भूषण, विरुद्ध छहत्तरी, रुक्मिणी मंगल, छप्पयनीति, कवित्त संग्रह, सूर-सागर, सूर-सारावली, साहित्य लहरी, रामचरित मानस इ. काव्य ग्रंथांचा अभ्युदय अकबर काळातच झाला.
५)अबूल-फजल लिखित 'आईने-अकबरी' तसेच 'मुन्तखबुततवारीख' इ-देखील याच काळातले.
६)अकबर भारतीय राग तसेच ईरानी संगीतातील सिद्धान्त (शास्त्र) तसेच प्रात्यक्षिक दोहोंचाही ज्ञाता होता.
७)अकबराच्या दरबारातील संगीतज्ञ[५] -

| | | | |
|---|---|---|---|
| १) तानसेन | ५) शाहाब खाँ | ९) नायक चरचू | १३) रंग सेन |
| २) रामदास | ६) दाऊद खाँ | १०) प्रवीन खाँ | १४) शेखदावन ढारी |
| ३) सुबहा खाँ | ७) तान तरंग खाँ | ११) सूरदास | १५) रहमतउल्ला इ. |
| ४) मियाँ लाल | ८) मुल्ला इश्हाक | १२) चाँद खॉ | |

### *अकबराच्या दरबारातील विदेशी कलाकार[६] -*

उदा. मुहम्मद, उ. युसूफ, कासिम, ताशवेग, मीर सैय्यद अली, सुल्तान हाफिज हुसैन, बहराम कुली, सुलतान हाशिम, उ. शाह मुहम्मद, मुहम्मद अमीन हाफिज, ख्वाजा अली, अब्दुल्लाह, पीरजाद, उ. मुहम्मद हुसैन इ.

### फकीरुल्लाह नुसार -

सूरज खाँ, नायक भगवान लिास खाँ, मदन खाँ, नौबात खाँ, हसन खाँ, सूरत सेन, लाला, देवी, ब्रम्ही, आकिल इ. अकबराच्या दरबारात कवी होते.

### संगीत ग्रंथ :

१)तानसेन उत्कृष्ट गायक तर होते परंतू ते हिंदीचे कवि होते. त्यांनी लिहिलेल्या पुढील ३ काव्यग्रंथाधारे ते सिद्ध होते. १) राग माला २) संगीत सार, ३) गणेश स्तोत्र.
२)दक्षिणेत आदिल शाह (दुसरा) यांनी किताब-ए-नौरस' नावाचा काव्य ग्रंथ लिहिला. तो धृपद संग्रह होता.
३)अकबरी दरबारातील हिंदी कवि चतुर्भूजदास ब्राम्हण, राजा आसकरण, राजपृथ्वीराज, सूरदास, मदनमोहन, मनोहर कवि, राजा टोडरमल, नरहरि, ब्रम्ह, तानसेन, गंग, रहीम, चंद्रभान, व्यास, करनेश, कुंभनदास, दुरसा, होलराय इ.नी संगीत ग्रंथलेखन करुन संगीत साहित्य समृद्ध केले.७

### तानसेन लिखित संगीतसार :

| | | |
|---|---|---|
| संगीतसार | - | एकुण पृष्ठ - ८२, |
| लिपिकाळ | - | संवत १८८८ |
| लिपिकार | - | हेठासिंह |
| संपूर्ण ग्रंथ | - | दोहा छंदात आहे |
| छंद | - | १८४, १ कवित्त, १ सवैया आहे. |

### ग्रंथाचे अंतरंग :

तानसेनाने संगीताच्या विविध अंगांचे वर्णन केले आहे. संगीताचे २ प्रकार, नादलक्षण इडादि लक्षण, ब्रह्मग्रंथि, श्रुति स्वर, स्पतक, आरोही अवरोही लक्षण, शुद्ध तान विवेक, कूटतान लक्षण ग्रामलक्षण औडव षाडव भेद, स्वर अंतर मूर्च्छना - मूर्च्छनांचे लक्षण, राग-रागिणी उत्पत्ति विषयक प्राचीन मत, वाद्यांची निरनिराळी नावे, प्रकार गायन दोष, गायन गुण लक्षण, स्वर साधारण, जातिसाधारणादि विषय वर्णिलेले आहेत. या ग्रंथाचे वैशिष्ट्य तालाध्यायात दिलेले आहे. तालाध्यात ताल, त्याचे सात अंग, नांवे, प्रत्येकाच्या मात्रा, मात्रांचे स्वामी; देवता, त्यांची चिन्हे इ. प्रकारचे विस्तृत विवेचनात्मक विश्लेषण आहे.

### २) रागमाला :

या ग्रंथातील दोह्यांची संख्या - ३०८

### या ग्रंथात वर्णिलेले विषय -

शास्त्राशी संबंधित आवश्यक वर्णन केल्यानंतर संगीताची व्याख्या, संगीताचे लक्षण, संगीताचे प्रकार, नाद शक्ती, श्रुती लक्षण सुषुम्ना नाडी लक्षणांची नांवे, त्यांची स्थानं, लक्षण आहेत अनाहत लक्षण, इंगला पिंगला, ग्राम, स्वर, तानविवेक, औडव तान, कूट तान, षाडव तान इ. साधारण स्वर, रागांग-भाषांग-क्रियांग, उपांग व्याख्या, गायकांचे प्रकार, रागांची १० लक्षणं, रागांचे तीन प्रकार, ७ स्वर, आलाप गमकासोबत गायकाचे गुण-अवगुणाचे वर्णन राग मालेत मिळाले. याशिवाय राग संकीर्ण अध्यायात विविध राग-रागिणींचे विस्तारपूर्वक विवेचन केले आहे. या ग्रंथाचे विशेष हे की -तानसेनाने संगीतकलेत नैपुण्य प्राप्त केल्यावर आपल्या पूर्वीचे संगीतज्ञ भरतमुनि, शारंगदेवादिंचे ग्रंथाध्ययन केले आहे.

### ३) गणेशस्त्रोत्र :

या ग्रंथात तानसेनाने तत्कालीन सांगीतिक वातावरण आणि जनसामान्यांची आवड लक्षात घेऊन भारतीय संगीतात नवीन रागांची, वाद्यांची, त्रिवट चतुरंगासारख्या गायनशैलींची आणि संगीतसार रागमाला, गणेश स्तोत्रासारख्या अद्वितीय सांगीतिक शास्त्रग्रंथांची रचना करुन भारतीय संगीताला जनसामान्यात लोकप्रिय बनवले.

### पुंडरिक विठ्ठल लिखित 'सद्राग चंद्रोदय' :

महाराष्ट्रातील नाशिक जवळील आनंदवल्ली येथील फारुकी घराण्याच्या बुरहनखाँ राजाच्या आश्रयात पहिल्याने तो होता. त्याने लिहिलेला पहिला ग्रंथ या राजाच्या आश्रयाखाली लिहिलेला आहे.

### सद्रागचंद्रोदयाचे अंतरंग :

प्रारंभी अगदी संक्षिप्त स्वर, ग्राम, श्रुति इ. कल्पना दिलेल्या आहेत. नादोत्पत्ती ने नाभी स्थान, प्राणाचे स्थान ब्रह्मग्रंथी, २२ श्रुती उत्पत्तीच्या नाड्या, स्वर श्रुति संख्या, पशूंच्या आवाजाचे स्वर (श्लो. १६ ते २५) सांगितलेले आहेत.

श्लोक २६ ते ३३ - शुद्ध विकृत स्वरांच्या संज्ञा सांगून श्रुत्यन्तरे दिली आहेत.
श्लोक ३४ ते ८२ - वादी-संवादी, ग्राम मूर्च्छना, मच्र्छनांची नांवे, ताना कूटताना, ग्रह, न्यास, वर्ण अलंकारांची माहिती.

### वीणा प्रकरण :

वीणा स्तुती, शुद्धमेलवीणा, मध्यमेलवीणा, वीणेवरील पडदे, त्यांवरील स्वर, कोणत्या तारांवरील कोणते स्वर वगळायचे ते, स्वयंभू-स्वर इ.

पुंडरिकाने एका सप्तकात शुद्ध - विकृत मिळून १४ स्वर धरले आहेत अन्तर काकली स्वरांना लघु-मध्यम व लघु-षड्ज यांत अंतर्भूत केले आहे.

चतु:श्रुति रि - ध व पंचश्रुति मध्यम हे स्वर रागात वाजवायचे असतील त्या वेळेला वीणेवरील पडदे थोडे सरकवून रागानुवर्ती करावे ही सूचना देखील पुंडरिकाने दिली आहे.

ह्या ग्रंथात पुंडरिकाने १८ मेल सांगितले आहे. रामामात्याचा हिजेज् मेल धरला आहे. त्याने भैरव राग त्या मेलात घातला आहे. श्रीरागमेल काफी थाट आहे. त्यात त्याने रि - ध चतु:श्रुतिक सांगितले आहेत, ते कल्लिनाथमतानुसार गमकालाप्ति प्रकरणात गमकाचे संक्षिप्त वर्णन केले आहे. रागस्थाय व आलापाची रीत यांचे वर्णन रत्नाकराप्रमाणे केलेले दिसते. ग्रंथात ग्रंथकाराने आपल्या निवासस्थानाचा उल्लेख केला आहे.

''कर्णाटि शैव गंगाभिधनगनिफटे सातनूर्षाव्हयो यो
ग्रामस्तत्राजन्म प्रवरसुनिक राजा मदन्याऽस्ति वंश:''
तत्र श्री विठ्ठलार्योऽ भवदमितयशास्तद्गुणख्यातु तस्यै''
तत्सूनो राग चन्द्रोदय इतिच भजन् कैरवाणां मुदेऽस्तु८

### रागमंजरी :

### ग्रंथाचे अंतरंग -

१)पुंडरिकाने षड्ज - पंचम सोडून बाकीचे स्वर तीन श्रुतीपर्यंत एक - एक श्रुति याप्रमाणे चढत जातात.
२)मात्र गंधार चार श्रुतीपर्यंत चढतो. या चढविण्यात त्याने गति नांव दिले आहे.
३)अकबराच्या जमान्यात इराणी रागांच्या संपर्कात आपले संगीत शास्त्रकार आले होते. परिणामी पुंडरिकाने पर्शियन रागाची तुलना उत्तर हिंदुस्थानी

रागांशी केलेले आहे.

४)पर्शियन रागांना त्याने परद नाव दिले आहे.
''अन्येऽपि पारसिकेया रागा: परदनामका: ।
संपूर्णा सर्वगमका: काकल्यन्तरिता: सदा ।।[९]

### रागमाला :

### ग्रंथाचे अंतरंग -

१)सहा पुरुष राग, प्रत्येकाच्या ५ भार्या व पाच पुत्र हे त्याकाळीतील हिंदुस्थानी राग वर्गीकरण दिले आहे.
२)ही भार्या - पुत्र व्यवस्था इराणी संगीतातून घेतली गेली असे काही विद्वानांचे मत आहे.
३)हा ग्रंथ कपिलमुनी साठी लिहिल्याचे म्हटले आहे.

श्रीमत्कपिलमुन्यर्थम् क्रियते रागमाला: ।

४)त्याकाळाचे हिंदुस्थानी थाट व रागांचे वर्णन आहे.
५)रागमालेचा रचना - काळ ग्रंथ कर्त्याने इ.स. १५७६ हा दिला आहे.

### नृत्य नर्तन - निर्णय :

हा ग्रंथ पुंडरिकाने सम्राट अकबरला खूष करण्यासाठी लिहिला आहे असा त्याने खुलासा केला आहे.

'अकबर-नृप-रुच्यर्थ .......कृतमिद्म ।।[१०]

### ग्रंथ अंतरंग -

१)पुंडरिक विठ्ठलाचा चौथा ग्रंथ आहे.
२)या ग्रंथात नृत्यकलेच्या महत्वपूर्ण सिद्धांन्ताचा उल्लेख मिळतो.
३)नाट्य, नृत्य आणि नृत्तादिची व्याख्या,
४)रस, भावाभिनय, रसाभिनय, वेशभूषा तसेच मुद्रांचे विस्तृत विवेचन केले आहे.

अकबर काळातील स्वामी हरिदास, धृपद शैलीचे आचार्य 'संगीत शास्त्राचे' देखील आचार्य होते. 'नाद-विनोद' ग्रंथात हरिदासजी गंधर्व - कोटिचे संगीतज्ञ मानले गेले आहे.

गंधर्व - कोटिचे संगीतज्ञ मानले गेले आहे. धृपद - धमार गायकीस विशुद्ध रुप देण्याचे कार्य स्वामी हरिदासांना आहे.

हरिदास स्वामी तिन्ही कलामध्येपारंगत होते. त्यांच्या अनेक रचनांमधुन हे सिद्ध होते.

### स्वामी हरिदासजींच्या रचना :

१)स्वामीजींच्या रचनांत गायन वादन नृत्य संबंधित अनेक पारिभाषिक शब्द मिळतात.

२)वाद्यांची नांवे, बोल इ. दिसून येतात.
३)नृत्याच्या अनेक मुद्रा तसेच तालाचे संकेत मिळतात.
४)संपूर्ण काव्यात संगीत संबंधी शब्द प्रयोग अर्थात राग-रागिनी, आलाप, सूर, नृत्य, मृदंग, बंधान प्रकृति, डफतार, तालांचे प्रकार, तत्व, शुद्ध सरुप रेखा परमान गुनी, ताताथेई, श्रुति, केदारौ, अद्‌भूत गति, चन्द्रागति, धात, भाषा, ताल, रबाब, रास, ताण्डव-लास, अधौटी, बीन, तार, मन्द्र, तिरप, लाग-डाट, किन्नर, तान, बंधान, अगहार, धृपद, अग्रनाभि, आरभटी इ.

यांवरुन स्वामी हरिदासांचे सांगितिक पांडित्य प्रकट होते.
स्वामीजींचे १२८ धृपदे आहेत. यांतील ११० 'केलिमाल' नावाने प्रसिद्ध आहेत.

बैजू बावरा -अकबरकाळात बैजूची कला परमोच्च शिखरावर होती. बैजूने गूजरी तोडी, मृगरंजनी तोडी मंगल गूजरी इ. अनेक रागांना बनविले. प्रचलित 'धमार' तालाचा निर्माता बैजू आहे.
गोपाललाल - धृपदाचा रचयिता
संत सूरदास-सूरसागर, साहित्यलहरी सूरसारावली या महत्वपूर्ण ग्रंथाची रचना केली. सूरदासांना राग, ताल ज्ञान होते, सूरदास भक्त, गायक आणि कवि होते. सूरदासांच्या संगीत साधनेत संगीताचे मोक्षरुप अगोचर होते.
नायक चर्चू-तोमर वंशज, अकबराच्या दरबारात सुप्रसिद्ध संगीत कार होते. 'चरजू की मल्हार' नावाच्या व्यतिरिक्त अनेक राग निर्माण केले.
सुजान खाँ -अकबराचे दरबारी गायक होते. मक्का - मदिनेला जाऊन तेथील लोकांसमोर पैगंबर हजरत मुहम्मदांच्यावरील प्रशस्तीगीते गायन करुन ख्याति व प्रतिष्ठा मिळविली.
चांदखाँ सूरजखाँ - तानसेनांचे गायनातील सहयोगी होते. यांच्या नावाचे वैशिष्ट्य असे की चाँद खाँ रात्रिकालिन गायल्या जाणारे राग गात असत त्यांचे टोपणनांव 'शशि' होते, सूरज खाँ दिवसा गायल्या जाणाऱ्या राग-रागिणी गात असते.

### आईने - अकबरी :

स्वत: अकबराने साहित्याच्या प्रगतीसाठी खूप प्रयत्न केले. या काळात ऐतिहासिक सांगितिक आणि अरबी, फारसीत अनेक काव्य ग्रंथ लिहिल्या गेलेत.
या काळात धृपदाचा विकास झाला.

### आईने-अकबरीचे अंतरंग

अबुल फजल रचित ग्रंथात सात अध्याय आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) स्वराध्याय | २) रागविवेक | ३) प्रकीर्णाध्याय | ४) प्रबन्ध अध्याय |
| ५) तालाध्याय | ६) वाद्याध्याय | ७) नृत्याध्याय | |

उपसंहारात अबुल फजल म्हणतात बादशहा अकबर अर्थात जगाचे अधीश्वर वर्णित विषयांव्यतिरिक्त अनेकोविध विषयांचे वर्णन आहे. जसे -

१)राजकीय संभ्रमचिन्हादींचे वर्णन
२)खुरासमीय रीतीने दोनशे पेक्षा अधिक संगीत रचना आहेत.
३)अकबर राज्यकाळातील संगीतोत्कर्षाची चर्चा केलेली आहे.
४)आईने अकबरीत ३६ संगीतकार व गायकांची नांवे आहेत. त्या ३६ पैकी १५ कलाकार ग्वाल्हेर चे होते.

### अकबरनामा :

अबूल फजल यांची रचना -
ग्रंथांची भाषा - फारसी
ऐतिहासिक ग्रंथात तत्कालीन संगीत, तसेच संगीतकारांविषयी घटनांचा उल्लेख आहे.

### अकबरनामा अंतरंग -

१)आदम पासून ते १७ व्या जलूसी वर्षापर्यंत
२)अकबराच्या १७ व्या वर्षाच्या मध्यापासूनते ४६ व्या वर्षापर्यंत.
३)त्यानंतर १६०५ ई.स. पर्यंत
४)सांगितिक गतिविधींचा उल्लेख.
५)ग्रंथाची भाषा - अलंकारिक, प्रभावी असून भाषा शैली अत्यंत रोचक असून सुगम आहे.
६)अकबराच्या शासनकाळातील घटनांचा उल्लेख.
७)अकबरनामा या गथ्रांत अबूल फजल लिहितो.[११] अकबर भारतीय राग, इरानी नग्मों के सैद्धांतिक और प्रयोगिक पक्षोंका पूर्ण ज्ञाता था।

### तारीख - ए - शेरशाही -

तारीख-ए-शेरशाही रचयिता 'अब्बास खाँ सखानी' या ग्रंथाला तुहफा-ए-अकबरीशाही म्हणतात. ग्रंथरचना-फारसी भाषेत. ग्रंथात - तीन अध्याय आहेत.

हुमायूँनामा - रचनाकार - गुलबदन बेगम (हुमायूँची बहिण)

### धृपदगायकीचा परमोत्कर्ष -

धृपदगायकीचा परमोत्कर्ष अकबरशासन काळातील होय. स्वामी हरिदास, मियाँ तानसेनांसारखे संगीततज्ञ मुळात धृपद गायक होते. अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध गायक सर्व धृपदियेच होते.[१२]

मानकुतुहल - राजा मानसिंहाने 'मानकुतूहल' ग्रंथ लिहून संपूर्ण भारत वर्षात धृपदाचा प्रचार-प्रसार केला.

### मानकुतूहलचे अंतरंग :

१)इतिहास, साहित्य, संगीत तिन्ही दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.
२)तत्कालिन भाषा, साहित्याचे अनुमान या ग्रंथाथावरुन सहज लावता येते.
३)धृपदाच्या विकासाचे अनुमान लावता येते.

### किताब-ए-नौरस :

किताब-ए-नौरसचे रचनाकार - इब्राहिम आदिलशाह
द्वितीय - धृपदिये होते.

### किताबे-ए-नौरसचे अंतरंग -

१)धृपदाचा विशाल ग्रंथ होय.
२)१७ रागांत ५९ धृपदे आहेत.
३)अनेक हिंदु देवी-देवतांची स्तुति आहे.
४)प्रत्येक धृपदाच्या वर रागाऐवजी 'मुकाम' शब्द प्रयोग केला आहे.
५)इब्राहिम आदिल शाह द्वितीय यांनी धृपदाच्या उन्नतीचे महान कार्य केले.

### सूर, मीरा, तुलसी आणि अष्टछाप कविंचे ग्रंथ -

### वरील रचनाकारांच्या ग्रंथातील निष्कर्ष -

१)वरील सर्व भक्तकवि भक्तिसंगीतात भावविभोर होते. त्यांनी एक वेगळीच भक्तिची ज्योत जनसामान्यांमध्ये जागविली.
२)भक्तकविंमध्ये सूरदासांचा सखाभाव, तुलसीदासांचा सेवकभाव, मीराबाईचा पतिभाव मुख्यत्वे दिसून येतो.
३)तत्कालिन सामाजिक, राजनीतिक, धार्मिक परिस्थितीचे प्रतिबिंब यांच्या रचनांत पहायला मिळते.
४)चैतन्य महाप्रभूंनी बंगाल मध्ये तसेच वल्लभ स्वामींनी ब्रजमध्ये भक्तिचा प्रचार प्रसार केला.
५)संगीत आणि गेयपद साहित्याच्या विकास आणि प्रचार-प्रसारात अनेक ख्यात-अख्यात, ज्ञात-अज्ञात, संतांचे, भक्तांचे गायकांचे खूप मोठे योगदान आहे.
६)तुलसीदासांच्या १२ ग्रंथरचना आहेत. काशी नागरी प्रचारिणी सभेने १२ ग्रंथांना प्रमाणित केले आहे.
तुलसीदासांच्या रचनांत ख्याल, धृपद, टप्पा, ठुमरी, लावणी इ.चे उदाहरणे आहेत.
७)अष्टछापाच्या कृष्णभक्त कविंनी भारतीय काव्य विकासात तसेच संगीताची अजस्त्र धारा प्रवाहित केली. तत्कालिनच नव्हे तर आजच्या गायकांसाठी देखील वरदान ठरली आहे. प्राचीन भारतीय काव्य आणि संगीताच्या विकासात अष्टछापाचा संतकवींचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान आहे.

### उपसंहार -

अकबरकालिन सांगितिक स्थितीचे अनुशीलन केले असता पुढील निष्कर्षापर्यंत आपण पोहोचतो.

१)अकबराच्या काळात संगीताचा सुवर्णकाळ मानल्यास वावगे ठरणार नाही.
२)केवळ अकबरच नव्हे तर त्याच्या दरबारातील नवरत्ने तसेच सर्व गुणी व्यक्तिंमध्ये साहित्यिक अभिरुची होती.
३)अकबराच्या काळात अनेक फारसी ग्रंथ संस्कृत आणि संस्कृत ग्रंथ भाषांतरित झाले.
४)संगीत सम्राट तानसेनाचा उदय आणि त्याच्या महत्वपूर्ण ग्रंथांचा रचनाकाळ अकबराचा काळ होय.
५)सद्रागचंद्रोदय, रागमंजिरी, रागमाला, नृत्य किंवा नर्तन निर्णय ग्रंथरचल्या गेलेत.
६)आईने अकबरी आणि ग्रंथांच्या माध्यमातून धृपदाचा परमोत्कर्ष साधला गेला.
७)सूर, मीरा, तुलसी, कबीर, अष्टछापाचे कविंचे रचित ग्रंथाद्वारे संगीत क्षेत्रास अपरिमीत लाभ.
८)अकबराच्या शासनकाळात अनेक महत्वपूर्ण ग्रंथांच्या रचना झाल्यामुळे धृपद गायकीच्या प्रगतीवर उचित परिणाम झाला.

थोडक्यात - अकबराच्या काळात संगीत आणि संगीत ग्रंथांना प्राधान्य मिळाले. त्याच्या प्रोत्साहनामुळे कवि, लेखक, गायक संगीतज्ञांमध्ये विशेष प्रेरणेचा संचार झाला. महान संगीतज्ञ तानसेनांची काव्यप्रतिभा ग्रंथरुपाने समोर आली.

संत मीराबाई तुलसीदास सूरदासादि भक्तकवींनी भक्तिची भागीरथी प्रवाहित केली. धृपदाचे लालन-पालन, पोषण, विकास अकबराच्या काळात झाला.

अष्टछापाच्या कविंनी आपल्या पदांद्वारे, संगीतज्ञानाने समाजाला एक सुनिश्चित, योग्य दिशा दिली.

सम्राट अकबराचे भारताच्या धार्मिक, राजकीय, राष्ट्रीय एकात्मता इ. विशेष योगदान आहे. अकबर स्वत:च संगीत प्रेमी असल्याने संगीत

कला घराघरांतून जोपासल्या गेली. अकबर स्वत: भारतीय राग तसेच ईरानी संगीताचा ज्ञाता होता. मुगल दरबारात २६० गायक वादक होते. यावरुन सम्राट अकबराकालीन युग भारतीय संगीताचे सुवर्ण युग होते हे सिद्ध होते.

*तळटिपा :*

१)Damo 'Music and Men' Pg.३५
२)Mologin, The History of Decan's Music,' Pg.५५
३)अग्रवाल, सरयू प्रसाद, अकबरी दरबार के हिंदी कवि. पृ. ९
४)तत्रैव पृ. १९
५)मालवीय श्रद्धा, भारतीय संगीतज्ञ एंव संगीत ग्रंथ पृ. ९१
६)तत्रैव पृ. ९१
७)तत्रैव पृ. ९३
८)सद्राग चन्द्रोदय - पुण्डरिक विठ्ठल पृ. २८
९)देसाई, चैतन्य, संगीत विषयक संस्कृत ग्रंथ, पृ. ३१९
१०)देसाई, चैतन्य, संगीत विषयक संस्कृत ग्रंथ, पृ. ३२०
११)'संगीत' मासिक पत्रिका डिसेंबर १९८७पृ. ७
१२)'संगीत' - हाथरस जुलै १९८६ पृ. ३-४

*संदर्भ ग्रंथ -*

१)दसाई चैतन्य (१९७९) संगीत विषयक संस्कृत ग्रंथ, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, सदाशिव पेठ, पुणे - ३०
२)बांगरे अरुण (१९९५) ग्वालियर की संगीत परंपरा, यशोयश प्रकाशन, हुबळी (कर्नाटक)
३)संगीत (मुसलमान और भारतीय संगीत अंक) जनवरी २०१३ अंक. संगीत प्रकाशन, हाथरस.
४)मालवीय श्रद्धा (२०१०), भारतीय संगीतज्ञ एवं संगीत ग्रंथ, कनिष्क पब्लिशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org